विद्याविकास

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/१०७ **विशेष मुदत वाढ** दिनांक : २५/०८/२०२५.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता योजना व उपक्रम लिंक, माहे मार्च, एप्रिल, मे व जुलै २०२५ कालावधीतील विद्यार्थी मानधन माहितीची लिंक

संदर्भ : १. या विभागाचे विविमं/२०२५–२६/००७, दिनांक १२/०६/२०२५ चे पत्र.
२. या विभागाचे विविमं/२०२५–२६/०२६, दिनांक ३०/०६/२०२५ चे पत्र.
३. या विभागाचे विविमं/२०२५–२६/०४२, दिनांक १२/०७/२०२५ चे पत्र.
४. विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या जिल्हानिहाय वार्षिक नियोजन सभा.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्राला अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विद्यार्थी कल्याण अधिकारी व निर्भय कन्या अभियानाचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने शुक्रवार, दिनांक २५ जुलै, २०२५ पर्यंत भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने योजना/उपक्रमांचे प्रस्ताव सादर न केलेल्या अथवा प्रस्ताव विहित पद्धती अपलोड करणे तसेच माहे मार्च, एप्रिल, मे व जुलै २०२५ अखेर या कालावधीत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची मानधन माहिती भरणे प्रलंबित असल्यामुळे अनेक महाविद्यालय/परिसंस्थांनी लिंक पुन:श्च कार्यान्वित करण्याची मागणी या विभागाकडे केलेली आहे.

अशा सर्व इच्छुक महाविद्यालय/परिसंस्थांच्या मागणीनुसार वरील संदर्भीय पत्राच्या अधिन राहून;

१. योजना व उपक्रमांचे ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव भरण्याची व अपलोड करण्याची लिंक
२. माहे मार्च एप्रिल, मे व जुलै २०२५ या कालावधीकरिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी प्रत्येक/सर्व विद्यार्थी मानधन माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याची

लिंक विशेष बाब म्हणून दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ रोजी कार्यान्वित करण्यात येणार असून सदर लिंक दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत सुरू राहिल.

त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे ऑनलाईन (Online) पद्धतीने अपलोड होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील. तर आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत माहे मार्च एप्रिल, मे व जुलै २०२५ या कालावधीकरिता सहभागी प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन पद्धतीने माहिती काळजीपूर्वक व जबाबदारीने अचूकपणे भरण्याबाबत व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याबाबत संबंधित विभागांना/शिक्षकांना अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०–७१५३३६३३
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०/८१

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक (अतिरिक्त कार्यभार), विद्यार्थी विकास मंडळ